अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## भारताने नोंदविला सर्वात मोठा विजय; २१ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला




✔ **नवी दिल्ली :** भारतीय संघाने पहिल्या वन-डे सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर दणदणीत विजय मिळवून १-० अशी आघाडी घेतली. अर्शदीप सिंगचे पाच बळी, आवेश खानचे चार बळी यांच्या भेदक गोलंदाजीनंतर पदार्पणवीर साई सुदर्शन, श्रेयस अय्यर यांनी झळकावलेल्या वैयक्तिक अर्धशतकाच्या जोरावर विजय नोंदवला.

अर्शदीप सिंग (५-३७) व आवेश खान (४-२७) यांच्या भेदक माऱ्यासमोर दक्षिण आफ्रिकेचा संघ लडखडला. अँडिले फेहलुकवायो (३३), टॉनी डे झॉर्जी (२८) यांनी सुरेख खेळ केला. अर्शदीपने १० षटकांत ३७ धावांत ५ बळी घेतल्या. कुलदीप यादवने शेवटची विकेट घेऊन आफ्रिकेचा डाव २७.३ षटकांत ११६ धावांवर गुंडाळला. प्रत्युत्तरात भारताकडून श्रेयस अय्यर (५२) व पदार्पणवीर साई सुदर्शन यांनी वैयक्तिक अर्धशतक केले. श्रेयस व साई यांनी दुसऱ्या विकेटसाठी ८८ धावांची भागीदारी केली. भारताने १६.४ षटकांत २ बाद ११७ धावा करून विजय पक्का केला. सुदर्शन ४३ चेंडूत ९ चौकारांसह ५५ धावांवर नाबाद राहिला.

भारताचा दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वन-डे क्रिकेटमधील सर्वाधिक चेंडू राखून मिळवलेला हा दुसरा मोठा विजय ठरला.

www.surajyadigital.com | सोमवार, दि. १८ डिसेंबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ७९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# प्रियकराने केला 'विश्वासघात'; प्रेयसीच्या जीवनाचा झाला 'घात'

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सोलापूरसह जिल्ह्यात प्रेमाचे लफडे वाढत चालले आहेत. त्यातून आत्महत्या होण्याचे प्रकारही वाढले आहेत. पोलीस दलापुढे ही एक मोठी डोकेदुखी झाली आहे. सोलापूर शहराच्या होटगी रस्त्यावरील शंकरनगर (शिवशाहीसमोर) येथे प्रेम प्रकरणातून एका १९ वर्षाच्या तरूणीला जीवन संपवण्याची वेळ आली. तिच्या प्रियकराने लग्नाचे वचन मोडले. एवढ्यावरच न थांबता त्याने आपल्या प्रेयसीला जगणे मुश्किल करण्याची धमकीही दिली. आता असले जीणे जगण्याऐवजी त्या प्रेयसीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी प्रियकर आणि त्याचे वडील यांच्यासह हत्तुरेनगरमधील एका नामवंत शाळेच्या दोघा संस्थाचालकांवर गुन्हा दाखल झाला आहे.**

## ● सोलापूरच्या होटगी रस्त्यावरील थरार...
## ● दोन शिक्षण संस्थाचालकांसह मुलगा, वडील अडकले





शंकरनगरमध्ये दर्शन आगरखेड हा तरूण राहतो. हत्तुरेनगरच्या शाळेत शिकत असताना त्याचे परिसरातील एका मुलीशी प्रेम जुळले. या प्रेमात त्याने आपली १९ वर्षांची प्रेयसीला लग्न करण्याचे वचन दिले होते. तिने त्याच्यावर मोठा विश्वास ठेवला. पण शिक्षणासाठी नातेपुते येथे जाताना त्याने तिचा विश्वासघात केला.

मी तुझ्याशी लग्न करणार नाही. समाजात तुझी बदनामी करून तुझे जगणे मुश्किल करतो, अशी धमकी त्याने दिली. ही बाब तिने तिच्या आईच्या कानी घातली. त्यातच ती शिकत असलेल्या मल्लिकार्जुन प्रशाला, हत्तुरे वस्ती या शाळेचे संस्थापक धऱ्याप्पा हत्तुरे, सुधाकर कामशेट्टी,आगरखेड सर यांनीही तुला शाळेतून काढून टाकतो, तुझी बदनामी करतो, अशी धमकी देऊन तिला शाळेत येण्यास मज्जाव केला होता. प्रियकर दर्शन आगरखेडने लग्नास नकार दिल्यामुळे त्या प्रेयसीने शुक्रवारी, दुपारी घरातील खोलीमध्ये जाऊन गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी तिचे वडील मल्लिनाथ खंडप्पा कोळी (वय-४५, शंकर नगर)यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार तिला आत्महत्येस प्रवृत्त करून तिच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. दर्शन आगरखेड, दर्शनचे वडील, संस्थापक धऱ्याप्पा हत्तुरे, सुधाकर कामशेट्टी अशी आरोपींची नांवे आहेत. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक सोळुंके तपास करीत आहेत.



## खंडोबा मंदिरावर रोषणाई

**चंपाष्टीनिमित्त बाळे येथील खंडोबा मंदिरावर विद्युत रोषणाई केली होती. त्यामुळे परिसर प्रकाशमय झाले होते.**

## लयभारी लोकांनाही सरळ करण्याची माझ्यात हिम्मत : शरद पवार

✔ सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पुण्यातील खेड तालुक्यात बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले होते. या कार्यक्रमातून शरद पवारांनी जोरदार राजकीय फटकेबाजी केली. मी अजून म्हातारा झालो नाही. भल्याभल्यांना सरळ करण्याची ताकद माझ्यात आहे, अशा आशयाचे वक्तव्य शरद पवारांनी केले.

त्यांच्या बोलण्याचा रोख नेमका कुणाकडे होता? यावरून राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. बैलगाडा शर्यतीच्या कार्यक्रमात संबोधित करताना पवारांनी त्यांच्या वयाचा उल्लेख करणाऱ्या कार्यकर्त्यांबद्दल मिश्किल टिप्पणी केली. तुमच्या सगळ्या भाषणांमध्ये मी ८४ वर्षांचा झालो, मी ८३ वर्षांचा झालो, असा उल्लेख करता. पण तुम्ही माझं काय बघितलंय. मी अजून म्हातारा झालो नाही.

## पोहरगावात कोयत्याने केलेल्या मारहाणीत मुलगी जखमी; तिघा महिलांसह चौघांवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

तुमची मुलगी आमच्या मुलीकडे का बघते? या करणावरून कोयत्याने केलेल्या मारहाणीत मुलगी जखमी झाली. ही घटना पोहरगाव (पंढरपूर) येथे शनिवारी दुपारच्या सुमारास घडली.

या प्रकरणात पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी तिघा महिलासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सानिया रमजान शेख (पोहरगाव) असे जखमी झालेल्या मुलीचे नाव आहे. या संदर्भात तिची आई पाकिजा रमजान शेख यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी गणेश काळे (पोहरगाव), त्याच्या घरातील मुली, महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पाकिजा शेख यांची मुलगी, पती आणि घरातील मंडळी शनिवारी दुपारी ४ वाजता घरासमोरील कॉटवर बसले होते. त्यावेळी गणेश काळे हा तुमची मुलगी सानिया ही आमच्या मुलीकडे सारखे सारखे का बघते? असे म्हणत भांडण केले. त्यावेळी तो सुरा घेऊन रमजान शेख यांना मारण्यासाठी त्यांचा अंगावर धाऊन आला. एका तरुणीने कोयत्याने सानियाच्या हातावर मारून गंभीर जखमी केले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.

## अक्कलकोटजवळ कार-दुचाकीचा अपघात

### एक ठार; एक गंभीर

✔ सुराज्य/सोलापूर

भरधाव वेगात निघालेल्या कारने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. या धडकेत एकजण ठार तर एकजण जखमी झाल्याची घटना सोलापूर-अक्कलकोट रोडवरील वळसंगजवळ घडली. शिवाजी दगडू गायकवाड (वय ५९, रामपूर) असे मयत झालेल्याचे नाव आहे.

खंडू मलारी चौधरी (वय-३५, दहिटणे, अक्कलकोट) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नरेंद्र विठ्ठल क्षीरसागर (वय-३२, नीलमनगर) याच्याविरोधात वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

सोलापूर ते अक्कलकोट रोडवर न्यू वळसंग वाडा समोरील हायवेवर फिर्यादी हे (एम.एच.-१३ व्ही.डी. २३७७) या दुचाकीवरून वळसंग गावाकडे जात असताना पाठीमागून येणारी कारने (एम.एच.-१३ डी. वाय. ३७९९) भरधाव वेगात दुचाकीला जोराची धडक दिली. यात फिर्यादी हे जखमी झाले. दुचाकीवर पाठीमागे बसलेला फिर्यादीचा मामाचा मुलगा शिवाजी हा गंभीर जखमी होऊन मरण पावला.

दुचाकी व कारच्या अपघातात मोटारसायकलचे तीन हजारांचे नुकसान झाले. अपघातानंतर कारचालक अपघाताची खबर न देता तसाच निघून गेल्याचे खंडू चौधरी यांनी फिर्यादीत म्हटले आहे. याची नोंद वळसंग पोलीस ठाण्यात झाली. तपास सहायक उपनिरीक्षक राठोड करीत आहेत.

## आधीच माकड आणि त्यात बेवडा; भुजबळांची जरांगेंवर बोचरी टीका

✔ सुराज्य/भिवंडी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी आक्रमक झाले आहेत. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावं, या मागणीवर मनोज जरांगे ठाम आहेत. शिवाय २४ डिसेंबरच्या आधीच सरकारने मराठा आरक्षणावर निर्णय घ्यावा, त्यानंतर एक तासही वाढवून देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. मनोज जरांगेंच्या इशाऱ्यानंतर ओबीसी नेते आणि अन्न तथा नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनीही आक्रमक पवित्रा घेतला आहे. ते भिवंडी येथील ओबीसी मेळाव्यात बोलत होते.

रविवारी (१७ डिसेंबर) भिवंडी येथे पार पडलेल्या ओबीसी मेळाव्यातून छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटलांवर जोरदार हल्लाबोल केला. भुजबळांनी जरांगेंचा एकेरी उल्लेख करत त्यांची तुलना मद्यपींशी केली. आधीच माकड त्यात बेवडा प्यायलेला, अशा अर्थाच्या म्हणीचा वापर करत भुजबळांनी टीकास्त्र सोडलं.



यावेळी छगन भुजबळ म्हणाले, हा जरांगे आमची लायकी काढतो. तो काहीही बोलतो. तो मला म्हणतो, हा येवल्याचा येडपाट' आहे. आता याला काय सांगायचं? एक म्हण आहे, आधीच मर्कट आणि त्यात मद्य प्यायलेला.. म्हणजे आधीच माकड आणि त्यात बेवडा प्यायलेला जरांगे काहीही बोलतो. अरे आमची लायकी तू काय पाहतो?

मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याला आमचा विरोध नाही. आमचा विरोध झुंडशाही आणि दादागिरीला आहे. आरक्षण म्हणजे गरीबी हटाव मोहीम नाही. सध्या ओबीसी प्रवर्गात वाटेकरी येऊ लागले आहेत. राज्यात सध्या ओबीसींमधून आरक्षण द्या, असा अट्टहास सुरू आहे. खोटे कुणबी दाखले दणादण दिले जात आहेत, असा आरोपही छगन भुजबळांनी केला.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



चार महिन्यात दुप्पट होतील, असं म्हणाले!

# सोलार कंपनीतील स्फोटात ९ जणांचा मृत्यू

## कामगारांची प्रवेशद्वारावर घोषणाबाजी; अखेर पोलिसांकडून सौम्य लाठीचार्ज

✔ सुराज्य/नागपूर

**नागपुरातील सोलार इंडस्ट्रीजमध्ये झालेल्या स्फोटात ६ महिलांसह ९ लोकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. संरक्षण क्षेत्रासाठी शस्त्रास्त्रांचे उत्पादन सोलार ग्रुपकडून केले जाते. या कंपनीच्या बाजारगाव येथील इकॉनॉमिक एक्सप्लोजिव्ह लिमिटेड या आयुध निर्माण कंपनीत रविवारी स्फोट झाला.**

## कर्मचारी आक्रमक : मुख्यमंत्र्यांनी केली पाच लाखांच्या मदतीची घोषणा

सोलार इंडस्ट्रींजमध्ये स्फोट झाल्यानंतर वेगवेगळ्या युनिटमधील सर्व कर्मचारी बाहेर पडले. सकाळी ९ ते साडे नऊ वाजतादरम्यान ही घटना घडली असून अद्याप कामगारांचे मृतदेह बाहेर काढण्यात आलेले नाहीत. त्या युनिटमधील बचावलेल्या मात्र गंभीर जखमी असलेल्या कामगारांनादेखील दुपारी दीड वाजेपर्यंत उपचारासाठी दवाखान्यात हलविण्यात आले नव्हते. मृतांच्या नातेवाईकांना ५ लाख रुपयांची मदत देणार असल्याची घोषणा केली. या घटनेनंतर कामगारांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला होता. जोपर्यंत मृत कामगारांचे मृतदेह मिळत नाही तोपर्यंत कंपनीच्या प्रवेशद्वाराहून हटणार नसल्याची भूमिका कामगारांकडून घेण्यात आली होती.

स्थानिक पोलिसांनी परिस्थिती चिघळू नये म्हणून राज्य आपत्ती प्रतिसाद दलाला पाचारण करण्यात आले.



संतप्त कामगारांवर वेळ पडल्यास बळाचा उपयोग करून प्रवेशद्वाराहून हटविण्यात येणार होतं. दंगल नियंत्रक पथक देखील घटनास्थळी पोहचले आहे. कामगारांद्वारे प्रवेशद्वारावर घोषणाबाजी सुरू होती. पोलिसांकडून सौम्य लाठीचार्ज करण्यात आला आहे. स्थानिकांनी या दुर्घटनेत नेमका किती जणांचा मृत्यू झाल्याचं माहिती नसल्याचं म्हटलं. स्थानिक लोकांना इथं कामावर घेतलं जात नाही, असं देखील सांगण्यात आलं. घटनास्थळापासून तिनशे मीटर अंतरावरुन पाहणी केली जात आहे. या कंपनीत हजेरीपटावर ज्यांची नावं आढळली त्यांना मृत जाहीर करण्यात आल्याचं स्थानिकांनी म्हटले. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागपूरमधील या दुर्घटनेत ज्यांचा मृत्यू झाला.